# चैत्र महिन्यातील महत्वाचे दिवस

हिंदूंच्या वर्षाचा प्रारंभ दिवस म्हणजे गुढीपाडवा, तर काहींच्या मते ब्रम्हदेवाने प्रथम जग उत्पन्न केले तो दिवस म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा! प्रभू रामचंद्रांनी रावण व इतर राक्षसांचा पराभव करून प्रथम अयोध्येत प्रवेश केला तो दिवस म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा. शालिवाहन शकाच्या वर्षाचा पहिला दिवस सुरु होतो तो चैत्र शुद्ध प्रतिपदा. अशा अनेक पौराणिक बाबी चैत्र महिन्यातील आहेत. या सर्वांना माहीत आहेत.

चैत्र महिन्यातील या हिंदू वैशिष्ठ्यांबरोबर अजूनही काही महत्त्वाचे दिवस या महिन्यात आलेले आहेत.

१२ महिन्यांपैकी काही महिन्यांची वैशिष्ट्ये ठरलेली आहेत. त्यातील २०२१ सालामधील खास दिनांच्या बद्दल थोडक्यात माहिती दिली आहे.

मराठी महिन्यातील पहिला महिना म्हणजे चैत्र. दिवस चैत्र शुद्ध १, श्री शालिवाहन शक १९४३ प्रारंभ होतो तो मंगळवार १३ एप्रिल २०२१, म्हणजे गुढीपाडवा. वसंत ऋतूची चाहूल, वृक्षांना नवीन पालवी फुटते. बरीच मंडळी नव्या संकल्पाची सुरुवात करतात ! याच दिवशी पारशी आदर मास आरंभ.

चैत्र शुद्ध २ या दिवशी संत झुलेलाल जयंती तर श्री अक्कलकोट स्वामी महाराज यांचा प्रगटदिन. याच दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती.
या नंतर चैत्र शुद्ध ६ ला श्री रामानुजाचार्य यांची जयंती. शंकराचार्यांनंतर दक्षिणेत तीनशे वर्षांनी अकराव्या शतकात रामानुजाचार्य जन्मले. त्यांनी त्यांच्या अगोदर सुमारे दीड हजार वर्षे प्रचलित असलेल्या वैष्णव संप्रदायाला ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहून वेदान्ताचा आधार दिला आणि भक्तिमार्गाला ज्ञान व कर्म यांच्यापेक्षा अधिक माहात्म्य प्राप्त करून दिले.

चैत्र शुद्ध ७ ला उन्हाने लाहीलाही होणा-या सौर ग्रीष्म ऋतू प्रारंभ होतो आहे. चैत्र शुद्ध ९ श्रीराम नवमी, म्हणजे सर्वांचे आराध्य दैवत प्रभूश्रीरामचंद्र यांचा जन्मदिवस. तसेच याच दिवशी श्री समर्थ रामदास स्वामी यांचा शके १५३० साली मराठवाड्यातील जांब या गावी जन्म झाला.

चैत्र शुद्ध १३ म्हणजे रविवार २५ एप्रिल रोजी भगवान श्री महावीर जयंती. आणि चैत्र पौर्णिमा /चैत्र कृ.१, मंगळवार दिनांक २७ एप्रिलला श्रीराम भक्त पवनसूत हनुमान जयंती, याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराज यांची पुण्यतिथी आहे.

चैत्र कृ.४ - दिनांक ३० एप्रिलला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती आणि संकष्ट चतुर्थी असा महत्त्वपूर्ण दिवस आहे.

चैत्र कृ.५ म्हणजे १ मे, या दिवसाचे महत्त्व तर सर्व ज्ञात आहे तो म्हणजे महाराष्ट्रदिन आणि सर्व कामगारांचा जिव्हाळ्याचा दिवस म्हणजे आंतरराष्ट्रीय कामगार दिन होय.

चैत्र कृ.१२ शनिवार ८ मे या दिवशी रविंद्रनाथ टागोर यांची जयंती आणि जागतिक रेडक्रॉसदिन तर चैत्र महिन्यातील शेवटचा परंतु वैशिष्ट्य पूर्ण दिवस चैत्र कृ.१३, रविवार. या दिवशी श्री अक्कलकोट स्वामी महाराज, संत गोरोबाकाका यांची पुण्यतिथी तर तारखेप्रमाणे महाराणा प्रतापसिंह यांची जयंती आहे.

आपण चैत्र महिन्यातील महत्वाचे वैशिष्ट्ये पाहिल्यावर एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे 'विविधतेतून एकता' त्या बरोबर सामाजिक उन्नती. या महिन्यात येणा-या थोर विभूतींच्या जयंती/पुण्यतिथी निमित्त त्यांनी दिलेले चांगले आचार-विचार घेऊन आपण पुढे जाऊ या.

यंदाच्या वर्षी कोरोनामुळे आपलं नविन वर्ष घरातच साजरं करुया. लवकरच हा कोरोना हद्दपार होण्यासाठी एकजूटीने व शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करुया.

आपणांस नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छ्या.

**सुधीर मेथेकर**